महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६१३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(४)/२०२३/तेवीस दिनांक:- ११ जून, २०२४

# -: प्रसिद्धीपत्रक :-

विषय :-महाराष्ट्र अराजपत्रित, गट- ब सेवा मुख्य परीक्षा – २०२३ (जाहिरात क्रमांक ०७०/२०२३).
दुय्यम निबंधक(श्रेणी-१)/ मुद्रांक निरीक्षक या संवर्गाच्या सुधारीत अंतिम निकालाबाबत

संदर्भः- १) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ३ एप्रिल, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ८ एप्रिल, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
३) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १५ एप्रिल, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक
४) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक १८ मे, २०२४ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्रमांक १, २ व ३ वरील प्रसिध्दीपत्रकान्वये अनुक्रमे सहायक कक्ष अधिकारी संवर्गाची तातपुरती निवड यादी तर दुय्यम निबंधक श्रेणी-१/मुद्रांक निरीक्षक व राज्य कर निरीक्षक संवर्गांचा निकाल प्रसिध्द करण्यात आला होता. तथापि सदर परीक्षेसंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र.५६९/२०२४ प्रकरणी दिलेल्या दिनांक १० मे, २०२४ रोजीच्या निर्देशानुसार उपरोक्त संवंर्गाच्या तात्परती निवड यादी/ शिफारस यादी मधील उमेदवारांसाठी संमती विकल्प (Consent Submission) मागविण्याची प्रक्रीया राबविण्यात आली होती.

२. संमती विकल्पा आधारे दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/ मुद्रांक निरीक्षक संवर्गाचा सुधारित अंतिम निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवारांचे गुण (Cut-off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

३. प्रस्तुत निकालात नमुद केलेल्या सर्व शिफारसपात्र उमेदवारांच्या शिफारशी, त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पदासाठीची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या तसेच आरक्षणाचे दावे/प्रमाणपत्रे विहित प्राधिकरणाकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

ठिकाण : नवी मुंबई

उप सचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग